**नियमित दिवाणी दावा नं. १४१/२०१८**
**निशाणी क्रमांक ४१ वरील आदेश**
**सी.एन.आर.क्र. MHK0110011512018**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ४७ नियम १ अन्वये निशाणी क्र. ३९ वरील झालेला आदेश पुनर्विलोकनासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जान्वये वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द अतिक्रमण काढून अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादींना द्यावा म्हणून दाखल केलेला आहे. सदर कामी वादीने निशाणी क्र.३९ ला वादीने मोजणी फी भरलेली रक्कम प्रतिवादीने वादीस निम्मी द्यावी म्हणून आदेश होऊन मिळणे करीता अर्ज दाखल केला होता व तो नामंजूर झाला. सदर आदेशाचे पुनर्विलोकन करुन निशाणी क्र.३९ चा अर्ज मंजूर होणेकरीता वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१ व २ यांनी म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे व अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. तसेच त्यांनी कथन केले आहे की, वादी यांनी कोर्ट कमिशनरचे अर्जावरती दिले आदेशाप्रमाणे रक्कम जमा न करता संगनमताने तातडीची फी जमा केली व सदर मोजणी आलेवेळी दावा मिळकतीमध्ये ऊसाचे पिक असल्याने मोजणी करता आली नाही. त्यास वादी हे पुर्णपणे जबाबदार असल्याने प्रतिवादी काही देणे लागत आहे. तसेच प्रतिवादी शिवाय अन्य सहहिस्सेदार प्रतिवादी म्हणून समाविष्ट आहेत व हजर झाले आहेत. त्यामुळे कमिशन फी वादी व सर्व प्रतिवादी यांनी देणे जरुरीचे आहे. वादी यांनी अनाधिकाराने कोर्टात तातडीची फी भरल्याने मोजणी होवू शकली नाही. त्यामुळे पुनर्विलोकन फी भरावी लागलेस वादी हेच जबाबदार आहेत. प्रतिवादी हे वादी यांना जमा केले कोर्ट कमिशनर यांचे फी पैकी निम्मे हिस्सेची फी कधीही देवू लागत नव्हते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा

खर्चासह नामंजूर करणेबाबत प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ व वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द अतिक्रमण काढून अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादींना द्यावा म्हणून दाखल केलेला आहे. वादीने निशाणी क्र.३९ कडे वादीने मोजणी फी भरलेली रक्कम प्रतिवादीने वादीस निम्मी द्यावी अशी विनंती केली होती. प्रस्तुतचा निशाणी क्र.३९ कडील अर्ज नामंजूर झाला व सदर आदेशाचे पुनर्विलोकन व्हावे म्हणून वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

६. निशाणी क्र.३४ कडील आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर आदेशाप्रमाणे मोजणी फी उभय पक्षकारांनी निम्मी–निम्मी भरावी असे नमुद आहे. त्याप्रमाणे वादीच्या कथनानुसार वादीने दिनांक ११/०६/२०२१ रोजी मोजणी फी म्हणून भारतीय स्टेट बँक शाखा हातकणंगले येथील चलन नंबर GRNMH002121637 ने रक्कम रुपये ५०००/– व दिनांक १३/०१/२०२२ रोजी पुनर्भेट मोजणी फी म्हणून भारतीय स्टेट बँक शाखा हातकणंगले येथील चलन नंबर GRNMH011614191 ने रक्कम रुपये २५००/– उपअधिक्षक, भुमी अभिलेख, हातकणंगले येथे भरले. सदर सर्व रक्कम ही वादी यांनीच भरलेली असून प्रतिवादी यांनी त्यांनी देय असलेली निम्मी रक्कम भरलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचे निम्मे हिस्सेचे रक्कम रुपये ३७५०/– प्रतिवादीने वादीस देणे आहे.

७. भारतीय मुदत कायदा, १९६३ च्या कलम १२४ मध्ये, १९०८ च्या दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत पुनर्विचार याचिका दाखल करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी निर्दिष्ट केला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता निशाणी क्र.३९ कडील

अर्जावर पुर्वहक्कदार यांनी दिनांक ०२/०३/२०२२ रोजी आदेश पारित केलेला आहे. त्यानंतर वादी यांनी अर्जाच्या पुर्नविलोकनाकरीता ३० दिवसात म्हणजेच दिनांक ०१/०४/२०२२ रोजी पुर्नविलोकन अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. परंतू वादी यांनी निशाणी क्र.४१ कडे दाखल केलेला पुर्नविलोकन अर्ज हा दिनांक ०८/०४/२०२२ रोजी दाखल केलेला आहे. याचाच अर्थ सदरचा अर्ज हा मुदतीत दाखल नाही. सबब, मुदतीच्या कायद्याच्या तरतुदीनुसार प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. कारणे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आ दे श

**१.** वादी यांचा निशाणी क्र. ४१ कडील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

**२.** खर्चाबाबत आदेश नाही.

JYOTI NITIN BHASME
Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2025.07.30 17:32:25 +05'30'

**पेठ–वडगांव.** **( जे.एन. भस्मे )**

**दिनांक ३०/०७/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**